लोकमत

# विद्यापीठात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी प्रशाळांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली.

संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हिल फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करारान्वये सायबर सुरक्षेबाबत सातत्याने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येतात. प्रशाळेचे संचालक डॉ. सतीश कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे, प्रा. मनोज पाटील, ठकन जानगवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आशिष पाटील, राजश्री कापुरे, पायस सावळे, पौर्णिमा चौधरी, कुणीका खैरनार, दर्शना हिरे, वैष्णवी साळुंके, नेहा पवार, लीना भोंडे, संजना अंदुरकर, गौरव चौधरी, गजानन घुले यांनी विविध प्रशाळांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली.

Jalgaon Main
Page No. 4 Oct 14, 2023
Powered by: erelego.com